*नियमित फौजदारी केस नं. ६२/२०१५*
*नि. क्र. २९*

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ चा जबाब शपथेवर सुरु.**

**नाव** – अशोक सोनु पागार,

**वय**– ६३ वर्षे, **व्यवसाय** – धंदा,

**राहणार** – पाटगांव, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून–**

**०१**. असे काही घडले नाही की, दिनांक ०३/०६/२०१५ रोजी पोलीसांनी माझ्याकडे चौकशी केली होती अगर कसे.

**(साक्षीदार पूर्वीच्या जबानीशी विसंगत साक्ष देत असल्याने विशेष सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली, परवानगी मंजूर.)**

**०२**. *(साक्षीदारास त्याच्या तपास टिपणातील **चिन्हांकीत भाग–अ** वरील मजकूर वाचून दाखविला). सदरचा मजकूर बरोबर आहे. (सदर चिन्हांकीत भाग–अ यास निशाणी क्रमांक देण्यास आरोपीतर्फे विधीज्ञांनी हरकत दर्शविली की, सदरचा मजकुर साक्षीदार स्वतः वाचु शकतो. सदर हरकतीवर सरकारी अभियोक्ता यांचा युक्तीवाद ऐकला. चिन्हांकित भाग–अ वरील मजकुर साक्षीदाराने मान्य केल्याने त्यास निशाणी क्रमांक देणे आवश्यक आहे. सबब, आक्षेप नामंजूर). (साक्षीदाराच्या तपास टिपणातील चिन्हांकित भाग अ यास **निशाणी क्र. ३०** देण्यात येते). (साक्षीदारास त्याच्या तपास टिपणातील **चिन्हांकीत भाग–ब** वरील मजकूर वाचून दाखविला).* सदरचा मजकूर बरोबर नाही. सदरचा मजकूर तसा त्यात का नमूद आहे याचे काही कारण मला सांगता येत नाही. *(साक्षीदारास नवीन इमारत बांधण्यासाठी परवानगी*

*मिळण्याबाबतच्या अर्जाची प्रत दाखविण्यात आली).* सदरचा अर्ज ग्रामपंचायतीमध्ये प्राप्त झाला होता का, यासाठी मला ग्रामपंचायतीचे मुळ अभिलेख पाहावे लागेल. *(साक्षीदारास ग्रामपंचायत, पाटगाव, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी, यांच्याकडील घर बांधणीस परवानगी बाबतचे पत्र दिनांक १४/१२/१९९४ रोजीचे दाखविण्यात आले).* त्याचे मुळ अभिलेख कोठे आहे, हे मला माहिती नाही. आरोपीला दाखविल्यास मी ओळखु शकतो. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास – आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. सी. एम. मांगले यांच्याकडून</u> –**

**०३.** हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या लहानपणापासुन पाटगांव, पागारवाडी येथेच राहतो. हे म्हणणे खरे आहे की, कृष्णा जंगम यांनी बांधलेले घर आमच्या वाडीजवळ, गोपाळवाडी येथे आहे. हे म्हणणे खरे आहे की, गोपाळवाडी व पागारवाडी या एकाच गवळी समाजाकडे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, बाळा महादेव जंगम यांचा मुलगा – दिपक जंगम हा आंबव येथील राजेंद्र माने इंजिनिअरींग कॉलेजमध्ये नोकरीस आहे.

**०४.** हे म्हणणे खरे नाही की, बाळा जंगम व कृष्णा जंगम यांच्यात जमीनीवरुन बरेच वर्षे वाद असल्याचे मला माहिती आहे. याची मला माहिती आहे की, बाळा जंगम यांना त्याच्या मिळकतीमध्ये जाण्यासाठी रस्ता नाही, यावरुन त्यांचे कृष्णा जंगम यांच्याबरोबर वाद आहेत.

**०५.** हे म्हणणे खरे आहे की, मी पाटगांव ग्रामपंचायतीत सरपंच म्हणुन कार्यरत असलेल्या कालावधीत मला ग्रामपंचायतीचे अभिलेख, विशेषतः कर आकारणी उतारे पाहण्याचा योग आला होता. हे म्हणणे खरे आहे की, घर बांधण्याची परवानगी मिळण्यासाठी ग्रामपंचायतीमध्ये अर्ज प्राप्त झाल्यानंतर मासीक सभेमध्ये तो अर्ज मंजूर करायचा किंवा नाही, याबाबत ठराव मंजूर केला जातो. हे म्हणणे खरे आहे की,

त्यानंतरच अर्ज केलेली व्यक्ती घर बांधण्यासाठी सुरुवात करते. हे म्हणणे खरे आहे की, अर्ज केलेली व्यक्ती तिची आर्थिक बाजु सांभाळून, घर बांधकाम पुर्ण झाल्यानंतर तशी बाब ग्रामपंचायतीस कळविते. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर ग्रामपंचायत पुर्णत्वाचा दाखला देते. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामपंचायतीने पुर्णत्वाचा दाखला दिल्यानंतर सदर घराची नोंद कर आकारणी उताऱ्यास घेतली जाते. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रक्रिया पुर्ण होण्यास साधारण ०१ ते ०२ वर्षे लागतात. हे म्हणणे खरे आहे की, पुर्णत्वाचा दाखला देण्यापुर्वी ग्रामपंयायतीचे कर्मचारी प्रत्यक्ष जागेवर जावुन घर बांधकाम परवानगीप्रमाणे केले आहे का, याची खात्री करुन मोजमापे घेतात. हे म्हणणे खरे आहे की, परवानगी देताना अर्जदाराच्या अर्जातील मोजमापे नियमाला अनुसरुन असल्यास त्यानुसार ग्रामपंचायत सदर मोजमापांमधील बांधकाम करण्याची परवानगी देते.

०६. *(साक्षीदारास नमुना नंबर आठ, करास पात्र असलेल्या इमारती आकारणीची यादी दाखविण्यात आली). (आरोपीतर्फे विधीज्ञांनी सदरचा दस्त मान्य असल्याचे कथन केल्याने व साक्षीदारास सदर दस्त उलटतपासात दाखविण्यात येवुन त्यावर प्रश्न विचारण्यात येत असल्याने त्यास **निशाणी क्रमांक ३१** देण्यात येते).* सदरचा दस्त पाहुन मी सांगतो की, त्यावर ग्रंथपाल, राजेंद्र माने इंजिअनिरींग कॉलेज, आंबव, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी यांची True Copy म्हणुन सही व शिक्का आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर राजेंद्र माने इंजिअनिरींग कॉलेज, आंबव, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी मध्ये फिर्यादीचा मुलगा नामे – दिपक जंगम नोकरीस आहे. हे म्हणणे खरे आहे की, कर आकारणीची यादी दर वर्षी केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्या वर्षीचे ती कर आकारणीची यादी आहे, हे त्यावर नमुद केले जाते.

०७. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. ३१ वर वरील भागात वर्ष लिहिलेल्या ठिकाणाची जागा कोरी आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या ग्रामपंचायतीमधुन देण्यात आलेल्या आकारणी वर्ष नमुद असलेल्या कर आकारणीची यादीवर वर्ष नमुद केलेल्या ठिकाणी एखादा कागद चिकटवुन त्याची छायांकित प्रत घेतल्यास निशाणी क्र.

३१ वरील कागदासारखी त्याची छायांकित प्रत येते. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १२/०६/२०१४ रोजी सदर निशाणी क्र. ३१ कडील कर आकारणी यादी पाटगांव, ग्रामपंचायत, सरपंच यांनी दिल्याचे दिसुन येते. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. ३१ कडील कर आकारणीची यादी कोणत्या वर्षीचे आहे, हे वर्ष नमुद असलेल्या ठिकाणी जागा कोरी असल्याने कळुन येत नाही.

०८. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या नावे पाटगांव, ग्रामपंचायतीत एकच घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. ३१ वर अनुक्रमांक ३०५ येथे गोपाळवाडी मिळकतीचा क्र. ३०४, मिळकतीचे वर्णन – घर कौलारु चिरेबंदी – ३७ X २८.१/२ (२८ लिहिलेल्या ठिकाणी खाडाखोड आहे), पत्र्याचा मंडप ३४ X १९, पुढील रकान्यात कृष्णा महादेव जंगम – पडवी ३७ X ५.१/२ असे नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, कर आकारणी यादीची पाटगांव, ग्रामपंचायत, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी मुळ अभिलेखावरुन छायांकित प्रत काढुन त्यावर सरपंच यांनी सही करुन सदरची निशाणी क्र. ३१ कडील प्रत दिलेली आहे.

०९. *(साक्षीदारास निशाणी क्र. ३३ सोबत दाखल कर आकारणी उताऱ्याची सत्यप्रत दाखविण्यात आली. सार्वजनीक दस्तऐवज असल्याने सदर दस्तास* ***<u>निशाणी क्रमांक ३४</u>*** *देण्यात येते).* हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. ३४ वर *''आज दिनांक ०२/०१/२०२५ रोजी मुळ रजिस्टर पाहता, नक्कल देण्यात आली''* असे नमुद करण्यात येवुन त्यावर पाटगांव, ग्रामपंचायत अधिकारी यांची सही आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. ३४ ही सन १९८९ — १९९० ची कर आकारणीची यादी आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. ३४ वर अनुक्रमांक ३१० येथे गोपाळवाडी मिळकतीचा क्र. ३०४, मिळकतीचे वर्णन – घर कौलारु चिरेबंदी – ३७ X ३४, पुढील रकान्यात कृष्णा महादेव जंगम असे नमुद असुन मिळकतीच्या लांबी–रुंदीच्या वर्णनामध्ये कोणतीही खाडाखोड दिसुन येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सन १९८९ – १९९० सालामध्ये परवानगीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर ३७ X ३४ चे बांधकाम करण्यासाठी परवानगी दिल्यानंतर सदरचे बांधकाम झाल्याने त्यावरुन त्याची नोंद कर

आकारणी उताऱ्यात घेतलेली आहे.

**१०**. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. ३० वर नमुद असल्याप्रमणे फिर्यादीला देण्यात आलेली ३७.१/२ X २६ परवानगी व आरोपीला देण्यात आलेली ३७ X ३४ ची परवानगी, या मधील सदर दोन्ही क्षेत्र साधारण समान आकाराचेच आहेत.

**११**. हे म्हणणे खरे आहे की, मिळकतीच्या सातबारा उताऱ्यावर अनेक कब्जेदारांची नावे नमुद असल्यास व एका व्यक्तीचा बांधकाम परवानगीसाठी अर्ज आल्यास इतर कब्जेदारांची संमती असल्याशिवाय ग्रामपंचायत परवानगी देत नाही. हे म्हणणे खरे आहे की, इतर कब्जेदारांची बांधकामास संमती असल्यास ती संमती योग्य प्रकारे असल्याबाबतची खात्री ग्रामपंचायतीकडुन केल्यानंतरच बांधकामासाठी परवानगी देण्यात येते.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.09.20 11:42:51 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दि. १९.०९.२०२५

न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख

-:CERTIFICATE:-

Judgment/order/evidence in ( in RC.C. No.62/2015)

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Devrukh |
| Date of decision | :- | 19/09/2025 |
| Evidence signed by PO. on | :- | 19/09/2025 |
| Evidence uploaded on | :- | 20/09/2025 |